
श्री साईनाथ प्रसन्न

# श्री साईलीला

## मासिक

वर्ष १७ ] शके १८६२ भाद्रपद. [ अंक ६

बाबा बाबा, निशिदिनि मना बोल रे बोल बाबा ॥
बाबा नामीं, कितितरी असे दिव्य जादु अबाधा ॥



बा बालिश्रे, त्यज शरण आ त्या न भूषा नवाचा ॥
बा बापा ना, तुज यमगृही, आपणाची जबाबा ॥

नळिनीदलगतजलमतितरलम् । तद्वज्जीवनमतिशयचपलम् ॥
क्षणमपि सज्जनसंगतिरेका । भवति भवार्णवतरणे नौका ॥१॥

—शंकराचार्य

संपादकः—रामचंद्र वासुदेव घैसास

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| श्रीदासगणूंचे पत्र | २३१ |
| शिरडी येथील प्रेक्षणीय स्थळें व त्यांचे महत्त्व | २३१ |
| साई—मौजा... | २३३ |
| साई—पर्दा .... | २३९ |
| शके १८६२ चा व्यास पौर्णिमेचा अहवाल.... | २४० |
| कै. धुमाळ यांच्या दुःखवट्याच्या सभेचा वृत्तांत | २४१ |
| बाबा रामभक्त होते | २४३ |
| श्रीसद्गुरु साईबाबा पुण्यतिथी उत्सव कार्यक्रम | २४७ |
| Announcement | २४९ |
| संस्थानवृत्त | २५० |
| श्रीसाईबाबाचें भक्तीप्रचार कार्य | २५० |
| शिरडीवृत्त | २५५ |
| Annual Meeting of Executive Committee of the Hospital | ,, |
| अनुभव | ४५ |


## श्रीसाईभक्तांस विनंती.

पुष्कळ भक्तमंडळींच्या पत्त्यांत फेरफार झाल्यामुळे त्यांना पोष्टांतून पाठविलेल्या उत्सवांच्या निमंत्रणपत्रिका व प्रसाद न पोहचतां परत येतात. तरी कृपा करून त्यांनी आपले पत्ते फेरबदल झाल्यास ऑ. चिटणीस रा. रा. श्री. ना. खारकर, ३७ चर्ई रोड, ठाणें यांस कळवावें.

भक्तांनी आपले अनुभव श्री साईलीलेंत प्रसिद्ध करण्याकरितां कृपाकरून खालील पत्त्यावर पाठवावेत. ज्यांना आपलें नांव प्रसिद्ध होणें नको असेल त्यांनी आपलें टोपण नांव व आपला पत्ता कळवावा म्हणजे तशी व्यवस्था होईल.

## वर्गणीदारांस विनंती

ज्यांनीं चालू सालची म्हणजे शके १८६२ ची वर्गणी ३ रु. ६ आणे अद्याप पाठविली नाहीं, त्यांनीं कृपाकरून ती खालील पत्त्यावर मनिऑर्डरनें पाठऊन द्यावी. अथवा व्ही. पी. करण्याचें सुचवावें, म्हणजे ३ रु. ९ आ. ची व्ही. पी. करणेंत येईल.


**रा. वा. धैसास, संपादक.**

लो. टिळक ज्युबिली ट्रस्ट बिल्डिंग नंबर २

गोखले रोड नॉर्थ; दादर, मुंबई १४.

# श्री साईबाबा



गोदावर्याः प्रवाहो विलसति यदुदक्पार्श्वतो योजनैकम् ॥
प्रादुर्भूत्वाऽत्मभूत्याऽनिशजनितमहे शीलधिक्षेत्रधाम्नि ॥
सर्वज्ञातीयवृंदैर्विविधजनपदादागतैः स्तूयमानः।
पूर्णब्रह्मैव साक्षाद्विजयति भुवनं पावयन्साइनाथः॥



## श्री शंकर

श्री. छ. श्रीधर नारायण खारकर यासी दासगणूचा अनेक आशिर्वाद.

पत्र लिहिण्यास कारण कीं मागें श्रीसाईबाबास गाणे येत होतें म्हणून त्याचें स्मारक या नात्यानें गवयाची नेमणुक कमेटीनें कायम केली. त्या नेमणुकीस पहिल्या प्रथमच माझा विरोध होता व त्याच वेळीं मी सांगितलें कीं श्रीसाई महाराज औषधी देत होते. तेव्हां त्या औषध देण्याचें स्मारक म्हणून एका वैद्यकीय विद्यालयातल्या हुशार विद्यार्थ्याला श्रीसाईबाबाचें नांवानें एक शिष्यवृती द्यावी. पण हें माझें म्हणणें त्यावेळी कमेटीला मान्य झालें नाहीं आणि गवयाची नेमणुक मात्र मान्य झाली मग मीच रामनवमीच्या उत्सवांत एक पंचवीस रुपयाची शिष्यवृत्ती पुणें आयुर्वेद विद्यालयात श्रीसाईबाबांचें नांवानें देण्याचें आज ५–६ वर्षापासून सुरू केलें आहे. त्याचप्रमाणें याही साली शिष्यवृत्तिकरितां २५ रु. पाठवले व मागची शिष्यवृत्ती कोणास दिली होती ते कळवा. त्याचें उत्तर विद्यालयाकडून आलें ते तसेंच माझे पेटीत पडून राहिलें होतें. तें मी आज पेटी साफ करतांना पाहिलें म्हणून त्याची पावती व विद्यालयाचें पत्र राम-

नवमीच्या अस्सल कागदात दाखल होण्यासाठीं आपल्याकडे पाठवले आहे. त्याप्रमाणें त्यांत ही पावती हें पत्र दाखल करावें. आणि मर्जी असल्यास व कमेटीची सम्मती असल्यास मागील सालची श्रीसाईबाबा शिर्डी नांवाची दरमहा दोन रुपयाप्रमाणें दिली गेलेली शिष्यवृत्ती पतकी नांवांच्या विद्यार्थ्यास दिली गेली आहे. असा उल्लेख श्रीसाई-लीलेंत करावा. व या सालची शिष्यवृत्ती कोणास दिली तें मी आपणांस कळवण्यासाठीं विद्यालयास लिहिलें आहे. तिकडून तुम्हांस लिहून आल्यावर त्याही विद्यार्थ्याचें नांव लीलेंत प्रसिद्ध करा. करायलाच पाहिजे असा माझा आग्रह नाहीं. नांव प्रसिद्ध करणें न करणें हें कमिटीचे मर्जीवर राहील. फक्त रामनवमीचे कागदांत हें सामील व्हावें इतकाच माझा हेतु आहे. व म्हणुन मी हें आपल्याकडे पाठवलें आहे. असो. आज रोजीं सं० जत येथें महाराज सरकारचें बोलावणें आल्यावरून जात आहे. काल रोजीं चांगदेव चरित्र उत्तरार्ध याची एक प्रत आपल्याकरितां पाठवली आहे तिचा स्वीकार व्हावा व प्रत पोहोचल्याचें कळवा. जतचे पत्त्यावर कळवा.

हेंच पत्रीं घरांतील सर्व मंडळीस अशिर्वाद.

पत्ता<br>
रामविलास राजवाडा,<br>
गेस्ट हाऊस,<br>
सं० जत.

दासगणू

आयुर्वेद महाविद्यालय, पुणें २.<br>
ता. ३०-८-१९४०.

रा. रा. श्री. ना. खारकर,<br>
ऑ. चिटणीस, श्रीसाईबाबा शिरडी संस्थान, ३७ चरई रोड, ठाणें.

कृ. सा. न. वि. वि.

ह. भ. प. दासगणू महाराज हल्लीं मु. जत यांचें पत्र आल्यावरून श्रीसाईबाब शिष्यवृत्ती धारकांचीं नांवें आपणांस कळवीत आहे.

गेल्यावर्षी विद्यार्थी श्रीराम व्यंकटेश पत्की.

यंदाचेवर्षी विद्यार्थिनी कु. शांता प्रभाकर देवधर.

वरीलप्रमाणें श्रीसाईबाबा शिष्यवृत्त्या देण्यांत आल्या होत्या. कळावे ही विनंति.

आपला,<br>
म. कृ. शिवगांवकर.

शेलधी ( शिरडी ) येथील अखंड चिंतनीय, नित्य
मननीय, चिरस्मरणीय व नितांत

# प्रेक्षणिय स्थलें व त्यांचें महत्व.

## १. पंच तीर्थानि अनुष्टुभवृत्तम्

तपोवनं गुरोर्गेहं, समाधि द्वारकांबिका ॥
चावडी शयनागारं, चेति तीर्थानि पंच वै ॥ १ ॥

अर्थः—रा. ब. मो. वि. प्रधान यांचे जागेंतील बाबांची बाग ( तपोवन ), बाबांच्या गुरुरायांची समाधि ( श्री. नवलकरांचे वाड्यांत असलेली ), बाबांचें समाधि मंदीर ( श्रीमंत बुटी बंधूंचे वाड्यांतील ), बाबांची द्वारकामाई ( मशीद ) व बाबांची चावडी ( एक दिवसा आड रात्रीं निजावयास जाण्याची जागा ), अशीं हीं पांच तीर्थें आहेत.

## २. पंचधनानि

इंद्रवज्राः—वित्तं यतीनां सुतपोवनंच । अर्थं गुरोर्गेहमतींद्रियाणाम् ॥
संपत्समाधिः खलुयोगिनांच । द्वारावती द्रव्यमिहव्रतिनाम् ॥२॥
उपजातिः—शय्यानिवासो वसु साधकानां । धनानि पंचेति सुनिर्मितानि ॥
मनीषिणां चित्तविशुद्धिहेतवे । दयालुना शैलधिनिर्जरेण ॥ ३ ॥

अर्थः—बाबांचें सुंदर तपोवन हें तापसांचें धन आहे. बाबांच्या गुरुरायांची समाधि हें अतींद्रिय असें जे ज्ञानी पुरुष त्यांचें धन आहे. बाबांचें समाधिमंदिर हें खरोखर योगिजनांचें धन आहे. बाबांची द्वारकामाई हें भक्तजनांचें धन आहे व बाबांचें शयनागार हें मुमुक्षुंचें धन आहे. अशी ही पांच प्रकारचीं धनें सद्भक्तांचें चित्तशुद्धि करतां शिरडीच्या देवांनीं निर्माण केलीं आहेत.

## ३. पंचदैवतानि.

### युथिका वृत्तम्.

अंडजः प्रियतपोवनदेवतम् । अत्रिजः शिवगुरुगृहदेवता ॥
अंबिकेश उ समाधि दैवतम् । द्वारका रुचिरदैवतमच्युतः ॥ ४ ॥

केशवोऽपि शयनगृहदैवतम् । एवमत्र शुभदैवतपंचकम् ॥
रक्षणाय मुनितापसयोगिनाम् । स्थापितं करुणया गुरुसाइना ॥ ५ ॥

अर्थः—अंडज म्हणजे ब्रम्हदेव हें बाबांच्या तपोवनाचें दैवत आहे. अत्रिज म्हणजे दत्त हें बाबांच्या गुरुरायांच्या समाधिगृहाचें दैवत आहे. अंबिकेश म्हणजे शंकर हें बाबांच्या समाधिमंदिराचें दैवत आहे. अच्युत म्हणजे विष्णु हें बाबांच्या द्वारकामाईचें दैवत आहे. केशव म्हणजे कृष्ण हें बाबांच्या शयनमंदिराचें दैवत आहे. याप्रमाणें या ठिकाणीं ( शिरडीत ) हीं पांच मंगलकारक दैवतें आहेत व तीं सद्गुरु बाबांनीं मुनी तापसी व योगी वगैरे भक्तांच्या संरक्षणाकरतां कृपेनें—स्थापन करुन ठेविलीं आहेत.

## ४. पंचरत्नानि.

पृथ्वी.

अहा प्रियतपोवनं, रुचिरनीलरत्नं खलु ॥
गुरुगृहमिदंतथा, सुरसपद्मरागः शुचिः ॥
समाधिरुरु मौक्तिकं, विमलहीरकं द्वारका ॥
अहो शयनमंदिरं, विशदविद्रुमश्चावडी ॥ ६ ॥

अर्थः—अहाहा ! बाबांचें प्रिय तपोवन हें खरोखर सुंदर नील रत्न आहे. त्याचप्रमाणें बाबांच्या गुरुरायांचें समाधिगृह हें शुद्ध दैदीप्यमान पद्मराग रत्न आहे. बाबांचें समाधिमंदिर हें महार्घ मौक्तिक रत्न आहे. बाबांची द्वारकामाई हें मौल्यवान हिरा रत्न आहे. आणि अहाहा! बाबांचें शयनागार हें स्वच्छ तेजस्वी प्रवाल रत्न आहे.

## ५. शैलध्यां पंचमातृकाः

द्रुतविलंबितवृत्तम् ।

उदि रहो जननी गदनाशिनी ॥
दुरितसंहरिणी धुनि रंचिका ॥
भ्रमनिरासकरी तुलसी प्रसूः ॥
भवविमोचक द्वारवती जनी ॥ ७ ॥

चिरमहो फलिनी मनमोहिनी ॥
सुरभि कल्पलता सुरवंदिनी ॥
विबुध साइगुरुमा प्रियपंचमी ॥
ध्रुवमिमाः शिलधीशुभमातृकाः ॥ ८ ॥

अर्थः—अहो उदीमाई भक्तांच्या रोगांचा नाश करते. धुनीमाई पातकांचा संहार करते. तुलसीमाई भ्रमाचा निरास करते. द्वारकामाई संसारांतून मुक्त करते. अहो आनंदकारक पांचवी दिव्य श्रीसद्गुरु साइमाउली ही निरंतर फल देणारी, चित्ताकर्षण करणारी, कामधेनु, कल्पलता, देवाना वंद्य अशी आहे. खरोखरच शिरडींतील ह्या मंगलकारक अशा पांच माता आहेत.

## ६. श्री साइतपारण्ये पंच देवतरवः

### शार्दूल विक्रीडितम्.

अम्रास्ते हरिचंदना अबुरका[1] स्ते दिव्यमंदारका : ॥
अश्वत्थाः[3] : खलु पारिजाततरवो ऽ रिष्टाश्च[2] संतानकाः ॥
स्वर्ग्यौदुंबर-पादपाः शुचितमा स्ते कल्पवृक्षा अहो ॥
पंचै ते ननुसंति देवतरवः[4] । साईतपारण्यके ॥९॥

अर्थः—ते आंबे हे हरिचंदन. ते लहान लहान तरवठ हे दिव्य लहान मंदार-वृक्ष-पिंपळ हे खरोखर पारिजातक, लिंब हे लहान लहान संतान तरु. ते उंबर हे अति-शुद्ध व स्वर्गीय असे कल्पवृक्ष. याप्रमाणें अहाहा! हीं पांच प्रकारचीं झाडें बाबांच्या बागेंतील देवतरु म्हणजे कल्पवृक्ष आहेत.

---

१ अबुर, शरपुष्प=तरवड. महराष्ट्र कोश विभाग १५ (त. २४)

२ अरिष्ट=निंब किंवा लिंब. अरिष्टः सर्वतोभद्र हिंगुनिर्यास मालकाः । पिचुमंदश्च निंबेच ॥ अमर. प्र. का. श्लोक ४१०.

३ अश्वत्थः—पिंपळ. बोधिद्रुमः चलदलः पिप्पलः कुंजराशनः अश्वत्थे इति. अमर. प्र. का. श्लो. ३६९.

४ देवतरु—कल्पवृक्ष. पंचैते देवतरवो मंदारः—पारिजातकः—संतानः—कल्पवृक्षश्च पुंसि वा हरिचंदनम्. अमर. प्र. का. श्लोक ५६–५७.

### ७. अस्मिन्नेव तपोवने पंच अकाराः " अ " म्हणजे " विष्णु "

आर्या.

अम्रः प्रथमाकारः । अब्रुरोऽयं वर्तते द्वितीयश्च ॥
पुण्योरुचिरोऽरिष्टः । अस्ति त्वकारोवरस्तृतीयश्च ॥ १० ॥
अश्वत्थस्तु चतुर्थः । औदुंबर एव पंचमाकारः ॥
एते दिव्याकाराः स्मर्तव्या । नित्यशः सुधीभिश्च ॥ ११ ॥

अर्थः—अम्र यांतील 'अ' हा पहिला अकार. अब्रुर यांतील 'अ' हा दुसरा अकार पुण्य व सुंदर, अरिष्ट यांतील ' अ ' हा तिसरा अकार, अश्वत्थ यांतील ' अ ' हा चवथा अकार. व औदुंबर यांतील ' अ ' हा पांचवा अकार. याप्रमाणें ह्या पांच दिव्य अकारांचें बुद्धिमान पुरुषांनीं निरंतर नामस्मरण करावें.

### ८. श्रीसाइतपारण्ये ॐकाररूपेण श्रीसाइब्रह्म निवासः

अनुष्टुप्वृत्तम्.

" अकारो अब्रुरो विष्णुः । "उकारो" दुंबरो भवः ॥
" मकारो " मालको ब्रह्मा । " अर्धमात्राऽम्र ऊ कला ॥१२॥
" बिंदु "र्बोधिद्रुमः कृष्णः । अर्धमात्रोपरिस्थितः ॥
एवमोंकाररूपेण । साइब्रह्म स्थितं वने ॥१३॥

अर्थः—अब्रुरतरूतील [ तरवड तरूतील ] 'अकार' म्हणजे विष्णु. उदुंबर तरूतील ['औदुंबर तरूतील ] ' उकार ' म्हणजे शंकर. मालक तरूतील [ लिंब तरूतील ' मकार ' म्हणजे ब्रह्मदेव. अम्र तरूतील [ आम्र तरूतील ] ' अकार ' म्हणजे ' अर्ध-मात्रा ' बोधिद्रुमातील [ अश्वत्थः पिंपळ वृक्षातील ] ' बकार ' म्हणजे ब्रह्मकलारूप अर्ध मात्रेवर बसलेला बिंदुरूप कृष्णपरमात्मा याप्रमाणें ॐकार रूपानें ह्या तपोवनांत बाबाकृष्ण साई ब्रह्माचा निवास आहे.

### ९. पूतपाणिना साइदेवेन अस्मिन्नेव तपोवने खाता ज्ञानवापी.

मंदाक्रांतावृत्तम्.

तन्वी रम्याऽमरबहुजला वर्तुला स्वादुनीरा ॥
स्निग्धच्छाया तरुपु निकटे स्रोतसश्चास्य प्रांते ॥

नानाभक्तैः सहविरचिता स्वामलाभ्यां कराभ्याम् ॥
साईशेन स्वभजकजनश्रेयसे ज्ञानवापी ॥१४॥

अर्थः—आपल्या भक्तजनांच्या कल्याणाकरता एक लहानशी पायऱ्यांची सुंदर, पुष्कळ जिवंत व गोड पाण्याची, बावोळी, लेंडी नाल्याजवळ कडेला गर्द छायेंत अनेक भक्तगणांच्या मदतीनें व आपण ही आपले विशुद्ध हात लावून, ज्ञानवापी नांवाची विहीर याच तपोवनांत बाबांनी बांधली आहे.

## १० बाबातपोवने श्री लिंदी ( लेंडी ) नाम्ना अल्पसरित्.

स्रग्धरावृत्तम्

आस्मिन्भागे पुराणी तनुतरसरिता लेंडि नाम्ना प्रसिद्धा ॥
द्वैधीकृत्वाऽस्यभूमिं प्रवहति सरला स्वल्पनीरा निदाघे ॥
शुष्कस्त्रोतस्यमध्ये प्रतिदिन मनिशंप्राक्षिपद्रूप्यटंकान् ॥
बाबाऽरिष्टानबूरान्स्वयमिह पयसा रोपयित्वान्यसिंचत् ॥१५॥

अर्थः—या तपोवनाचे भागांत एक अति लहान अत्यंत जुनी लेंडी नांवाची प्रसिद्ध नदी ( नाला ) या जमिनीचे दोन भाग करून सरळ वाहते. उन्हाळ्यांत तिला अति थोडे पाणी असते. या नदीचे शुष्क पात्रांत बाबा नेहमीं प्रत्येक दिवशीं चांदीची नाणीं फेंकून देत असत. बाबांनी या ठिकाणी स्वतः लिंबाचीं व तरवडाचीं झाडे लावून त्यांना ते स्वतः दररोज पाणी घालीत असत.

पृथ्वीवृत्तम्.

अहोऽल्पसरिदंतरे, उत्पतोरणस्तंभके ॥
अदर्शयदिहैकदा, रघुवराय तेजोमयम् ॥
सुवर्णवलयत्रयम्, घनसुदुर्निरीक्ष्योऽज्वलम् ॥
परीक्षितुमिव ध्रुवम्, भजक भाउचित्तं गुरुः ॥१६॥

अर्थः—एकदां ( असा चमत्कार झाला की ) याच ठिकाणी ह्या लहानश्या नाल्याचे पात्रांत, पसरणाऱ्या वेलींच्या कमानीच्या एका लहानशा ( पक्वा चुना विटांनी तयार केलेल्या ) खांबांत, खरोखर, जणुं काय, भक्त भाऊचें ( रघुवीर पुरंदरे यांचे ) मन पाहण्याकरतां बाबांनी रघुवीराला, अत्यंत विलक्षण डोळे दिपवणारी, अत्यंत तेजस्वी,

चाल—शांतता नको कधींच.

साईविना विषय नसो जीवनांत माझिया ॥ ध्रृ ॥

भव जलधी लहरी वरि—जीवन हें नृत्य करी ।
साईविना न दुजी तरि—परतीराला जाया ॥ १ ॥
तापत्रय सह समरीं—जविन हें युद्ध करीं ।
साई हीच शक्ति खरी—विजयाला मिळवाया ॥ २ ॥
माया भ्रम सुखवीमन—कधिं रडवीं रात्रंदिन ।
भ्रमनाशक साईविण—कोण असे जगतींया ॥ ३ ॥
जननी प्रेमास खरी—कसली ही येत सरी ।
त्याहुनी विशेष परी—साई जननीची माया ॥ ४ ॥
प्रणयाची तिखट सुरी—जीवन हें व्यथित करी ।
साई हीच शांति खरी—जीवना मधून या ॥ ५ ॥
साई हें सुखनिधान—साई हे संजीवन ।
साई हाच निखिलांतुन—राहिला भरूनिया ॥ ६ ॥

टेकवाडे
१५–७–४०

साईबाळ

---

अभंग—चाल पांडुरंग ध्यानी

विश्व हें अनंत अफाट अपार—दुःखा नच पार तया माजीं ।
तयांच्या आचेंनें जाजावला जीव-कोणा येई कींव? जिवाचीयां।
मायेचा अंधारें मायेचें जीवन—कोण तुझ्यावीण साईराया ? ।
रंगावितो नित्य नानासुख स्वप्न—निराश होऊन जाई अंती ।
धाव साईमातें लाविसी कां वेळ-होय तळमळ तुझ्यावीण॥१॥

टेकवाडे
२०–६–४०

साईबाळ

# सांईपदीं--

( चाल—ऐसा येई बा )

पायीं ठेवितसे । तव, माथा । सद्गुरु सांईनाथा ।

पाही अज्ञ असे । तव बाला । सन्मति देई तिजला ।
रवीच्या किरणानें । तम नासे । कृपा प्रसादे तैसे ।

तुमच्या, तम नासो । ममहृदिचा । अज्ञानांधाराचा ।
या भव कांतारीं । जीव असा । भटकत राही कैसा !

षड्रिपु व्याघ्रादि । टपुनिया । बसले धरुनि न्याया ।
मायापाशीं । हे मन गुंतें । संसारामधि रमतें ।

आशा, ममताही । संसारीं । ओढीत मजला भारी ।
नश्वर काया ही । आहे कीं । बोध न उपजे हृदयीं ।

भक्तिभाव नसे । ममहृदयीं । मन तळमळतें पायीं ।
माझा जीव उबे । गुरुराया । येई रे लवलाही ।

ज्ञानामृत पाजी । या दीना । हीच विनंति चरणा ।
करिते तुज पाशीं ।

लेखक. सौ. कमलाबाई करंदीकर.

डहाणू

श्री गजानन प्रसन्न ता. २-८-४०

श्री साईबाबा प्रसन्न

# शके १८६२ च्या व्यास पौर्णिमेचा अहवाल

—:०:—

श्री सद्गुरु बाबा माऊलीनें या वर्षी आपला व्यास पौर्णिमेचा उत्सव व्यवस्थित रितीनें मजकडून पार पाडून घेऊन पुढील उत्सवाची (श्रीच्या पुण्यतिथीची) जागृत करून दिली.

मजकडून ता. १ जूनपासून साई सत् चरित्र वाचण्याला प्रारंभ करून ता. १८ जुलै १९४० रोजी संपवून घेतले. नेहमीं पंधरा वीस पर्यंत साई भक्त सत् चरित्र ऐकण्यास येत असत. रा. कुलकर्णि यांजकडून श्रीस हार व प्रसादास नारळ शेवटचे पंधरा दिवस येत होता.

व्यास पौर्णिमेच्या दिवशीं रात्रीं १–३० ला साई सत् चरित्राची समाप्ती झाली नंतर रा. श्री. अनंतराव दातार यानी श्री गणेश पुराणाचे ११ अध्ययांचे पारायन केले. दुसरे दिवशीं सकाळी ७॥ वाजतां दोन्हीं पोथ्यांची पूजा झाली. व नंतर श्रीच्या पादुकावर व गजाननावर अभिषेक झाला. व सत्य विनायकाच्या पोथीचे पारायण झाले. उत्सवास तीन एकशे माणूस येऊन गेले. त्यांत विशेष म्हणजे माझ्या गुरुनी [श्री. गु. त्रिंबक बिठ्ठल सामंत] यांनीं खालील प्रमाणें प्रसाद करण्यास सांगितला होता. तो असा- रवा, खवा, साखर, तूप; दूध, प्रत्येकी पाव पाव रत्तल घेऊन त्यांत १ रत्तल खडी साखर घाल व तो प्रसाद सर्वास दे. त्याप्रमाणें उत्सवास आलेल्या ३०० माणसास पुरून शिवाय पाव रत्तल उरला. व या उत्सवास आलेले ठाण्याचें वकील श्री. गोपाळ भास्कर दातार त्यांनीं हे प्रत्यक्ष पाहिलें आहे.

आपले नम्र सेवक.

डॉ. केशव भगवंत गवाणकर

—:—

# श्रीसाई

शिरडी, ता. २-८-४०

श्री. संपादक, ' श्रीसाईलीला, ' यांसः—

कृ. सा. नमस्कार. वि. वि. खालील मजकूर कृपा करून श्रीसाईलीलेच्या अंकांत प्रसिद्ध करावा.

कै. वा. रा. ब. सखाराम बळवंत धुमाळ, मु. नासिक यांच्या निधनानिमित्त शिरडी येथील दुःखवट्याची सभा.

कै. वा. भाऊसाहेब धुमाळ यांच्या निधनानिमित्त दुःख प्रदर्शन सभा श्री. द्वारकामाईचे सभा मंडपांत ता. ३०-७-४० रोजी. रात्रीं ९ वाजतां भरली होती. सभेला सुमारें २५०।३०० लोक आले होते. त्यांत ह. भ. प. विश्राम बुवा, श्री. नानासाहेब रासने, व श्री. तात्याजी पाटील कोते, श्री. रामचंद्र पाटील कोते, ठमाजी पाटील शेळके, रघुनाथ पाटलि कोते, वामनराव गोंदकर पाटील, तात्या पाटील शिंदे, बिठोबा पाटील कोते, वगैरे गांवांतील पुढारी मंडळी, व श्री. आमले, श्री. औटी वगैरे शिक्षक मंडळी आणि श्री. नानुमामा पुजारी, श्री. विठ्ठलराव मराठे, श्री. बाळाभाऊ गुरव, श्री. गिरीराव देशपांडे वगैरे संस्थानची मंडळी हजर होती.

श्री. नानासाहेब रासने यांनीं श्री. तात्याजी पाटील कोते यांस अध्यक्षस्थान स्वीकारण्याची विनंति केली. तिला श्री. विठ्ठलराव यांनीं अनुमोदन दिलें. नंतर अध्यक्षांच्या वतीनें ह. भ. प. विश्राम बुवा यांनीं श्री. नानासाहेबास भाषणास सुरवात करण्याबद्दल विनंती केली. श्री. नानासाहेब रासने यानी कै. वा. भाऊसाहेबांच्या एकंदर आयुष्यासंबंधीं माहिती सांगून नंतर त्यांच्या अंगीं असलेल्या ठळक गुणाविषयी खालील-प्रमाणें विवेचन केलें.

श्री. भाऊसाहेब हे एक हुशार कायदे पंडित होते. त्यांचे सरकार दरबारीं चांगले वजन होतें. कायद्याच्या पुढील अभ्यासासाठीं विलायतेस जाण्याची त्यांची इच्छा होती व त्यांना अनुकूल संधीहि प्राप्त झाली होती. ते विलायतेस गेले असते तर लौकिक-दृष्टया त्यांचा पुष्कळ फायदाहि झाला असता. ' परंतु तुझी विलायत येथेंच आहे ' असें बाबांनीं सांगितल्यावर गुरुवचनावर पूर्ण विश्वास ठेऊन विलायतेस जाण्याचा विचार त्यांनीं सोडून दिला. त्यांचा स्वभाव सत्यप्रेमी,

## श्रीसाई

शिरडी, ता. २-८-४०

श्री. संपादक, ' श्रीसाईलीला, ' यांसः—

कृ. सा. नमस्कार. वि. वि. खालील मजकूर कृपा करून श्रीसाईलीलेच्या अंकांत प्रसिद्ध करावा.

कै. वा. रा. ब. सखाराम बळवंत धुमाळ, मु. नासिक यांच्या निधनानिमित्त शिरडी येथील दुःखवट्याची सभा.

कै. वा. भाऊसाहेब धुमाळ यांच्या निधनानिमित्त दुःख प्रदर्शन सभा श्री. द्वारकामाईचे सभा मंडपांत ता. ३०-७-४० रोजीं रात्रीं ९ वाजतां भरली होती. सभेला सुमारें २५०।३०० लोक आले होते. त्यांत ह. भ. प. विश्राम बुवा, श्री. नानासाहेब रासने, व श्री. तात्याजी पाटील कोते, श्री. रामचंद्र पाटील कोते, ठमाजी पाटील शेळके, रघुनाथ पाटलि कोते, वामनराव गोंदकर पाटील, तात्या पाटील शिंदे, विठोबा पाटील कोते, वगैरे गांवांतील पुढारी मंडळी, व श्री. आमले, श्री. औटी वगैरे शिक्षक मंडळी आणि श्री. नानुमामा पुजारी, श्री. विठ्ठलराव मराठे, श्री. बाळाभाऊ गुरव, श्री. गिरीराव देशपांडे वगैरे संस्थानची मंडळी हजर होती.

श्री. नानासाहेब रासने यांनीं श्री. तात्याजी पाटील कोते यांस अध्यक्षस्थान स्वीकारण्याची विनंति केली. तिला श्री. विठ्ठलराव यांनीं अनुमोदन दिलें. नंतर अध्यक्षांच्या वतीनें ह. भ. प. विश्राम बुवा यांनीं श्री. नानासाहेबास भाषणास सुरवात करण्याबद्दल विनंती केली. श्री. नानासाहेब रासने यानी कै. वा. भाऊसाहेबांच्या एकंदर आयुष्यासंबंधीं माहिती सांगून नंतर त्यांच्या अंगीं असलेल्या ठळक गुणाविषयी खालील-प्रमाणें विवेचन केलें.

श्री. भाऊसाहेब हे एक हुशार कायदे पंडित होते. त्यांचे सरकार दरबारीं चांगले वजन होतें. कायद्याच्या पुढील अभ्यासासाठीं विलायतेस जाण्याची त्यांची इच्छा होती व त्यांना अनुकूल संधीहि प्राप्त झाली होती. ते विलायतेस गेले असते तर लौकिक-दृष्ट्या त्यांचा पुष्कळ फायदाहि झाला असता. ' परंतु तुझी विलायत येथेंच आहे ' असें बाबांनीं सांगितल्यावर गुरुवचनावर पूर्ण विश्वास ठेऊन विलायतेस जाण्याचा विचार त्यांनीं सोडून दिला. त्यांचा स्वभाव सत्यप्रेमी,

निर्भीड, त्याप्रमाणेंच दिलदार व प्रेमळ होता. एखादा आपला माणुस म्हटला म्हणजे हजारों कामें बाजूस टाकून त्याचें काम ते करून देत असत. कार्य लहान असो वा मोठें असो ते धडाडीनें हाती घेऊन यशस्वी रितीनें पार पाडण्यांत त्यांना हातखंडा असे. सामाजिक बाबतींत त्यांचे उदार धोरण होतें. त्यांच्या सर्व गुणांचा कळस म्हणजे त्यांची श्रीसाई महाराजांच्या ठिकाणी असलेली अढळ निष्ठा होय. आपल्या आयुष्यांत होणाऱ्या लहानमोठ्या गोष्टी बाबांच्या इच्छेनेंच होतात असा त्यांचा दृढ विश्वास होता. ते वारंवार शिरडीस दर्शनास येत. व प्रत्येक वेळीं कोणातरी स्नेह्यास बरोबर दर्शनास आणित. आपल्या पक्षकारांना सुद्धां शिरडीस दर्शनास जाण्यास ते सांगत. शिर्डीविषयीं त्यांचे मोठे प्रेम होतें. शिरडी संस्थानांत वरचेवर नवीन सुधारणा करण्यासाठीं ते झटत असत. शिरडी संस्थानाप्रमाणें शिरडी गांवांतील बाबांच्या निकट भक्तांबद्दल त्यांस आपलेपणा वाटे.

श्री० भाऊसाहेबांच्या निधनानें शिरडी संस्थानचा, त्यांचे कुटुंबीय व स्नेही मंडळी यांचा एक मोठा आधार नाहींसा झाला आहे.

याप्रमाणें श्री. नानासाहेब रासने यांनीं श्री. भाऊ साहेबाविषयीं अत्यंत परिणामकारक व आपलेपणाच्या भाषेंत, सुमारें अर्धा तास भाषण केलें. त्यावेळीं लोकांचें हृदय भरून डोळ्यांस पाणी आलें. नंतर अध्यक्षांच्या वतीनें ह. भ. प. विश्राम बुवा यांनी समारोप केला. देवादिकांचीं उदाहरणें डोळ्यापुढें ठेऊन दुःख विसरण्याचा त्यांनी श्रोत्यास उपदेश केला. शेवटी, ' ही सभा कै. वा. भाऊसाहेबांच्या कुटुंबीयावर ओढवलेल्या दुःखद प्रसंगांत वाटेकरी आहे' याप्रमाणें दुःखवट्याचा ठराव करून त्याची एक प्रत अध्यक्षांच्या सहीनें कै. वा. भाऊसाहेबांच्या कुटुंबीयास पाठविण्याचें ठरले. नंतर सर्वांनी उभे राहून ' परमेश्वर, श्री. भाऊ साहेबांचें आत्म्यास शांति देवो.' अशी श्रीसाई महाराजांचे समाधीची प्रार्थना केली. व सभेचें काम संपलें. पुढें ह. भ. प. श्रीयुत विश्राम बुवा यांचें श्री विषयीं भक्ती रसानें ओथंबलेले कीर्तन रात्रौ ११॥ वाजेपर्यंत झालें नंतर सर्व कार्यक्रम खलास करण्यांत आलें.

कळावें, हे विनंति.

आपला,

दत्तात्रय दामोदर रासनें

मु. पुणें

---

श्रीसमर्थ

श्री. संपादक, श्रीसाईलीला, यांसी

सप्रेम नमस्कार विशेष,

'लीले'च्या गेल्या म्हणजे आषाढ १८६२ च्या अंकांत श्रीदासगणूंचे श्रीराम-चंद्राच्या मूर्ति स्थापनेबाबत संस्थान कमिटीस उद्देशून एक पत्र प्रसिद्ध झालें आहे. त्याबाबत बाबांच्या अवतार कार्याचा एक अभ्यासु या नात्यानें मला पण जे विचार सुचले ते लिहिण्याचा मोह अनावर होत आहे. श्रीदासगणूंना विरोध करण्याइतकी योग्यता वा अधिकार माझा नाहीं. किंबहुना हा लहान तोंडीच मोठा घांस मी घेत आहे. पण बाबांवरील प्रेमच तो घेण्याचें साहस करण्यास मला प्रवृत्त करीत आहे.

या विषयावर लिहिण्याचा मला एकमेव आधार जर कोणाला असेल तर श्री-साईचरित्र हाच होय. त्याचें ' अध्यात्मिक. निरीक्षण ' करीत असतां हें 'लीले'च्या वाचकांस माहीत आहेच. जों जों या निरीक्षणांत माझी तन्मयता होत आहे तों तों माझी अशी खात्री होत आहे कीं केवळ नाममात्र हेमाडपंतास पुढें करून हें आपलें चिरंजीव काव्य श्रीबाबांनी स्वतःच लिहीलें आहे. याचें प्रत्यंतर मला ओंवी-गणिक मिळत आहे. म्हणून प्रस्तुतच्या माझ्या विचाराला मी तोच आधारस्तंभ घेतला आहे.

बाबा हिंदु दैवताचाच अवतार होते याबाबत आतां तरी दुमत असावयास नको आहे. ते कोणाचा अवतार होते एवढाच फार तर विवेचनीय प्रश्न ठरेल. श्रीसाईस-चरितांत त्याचा स्पष्ट निर्णय दिला आहे.

" राम, कृष्ण आणि साई । तिघां माजीं अंतर नाहीं ॥
नामें तीन वस्तु पाही । ठायींचें ठायीं एकरूप ॥ ४४–८ "

हा निर्णय प्रमाण मानल्यावर रामाचें मंदीर कां वेगळें असूं नये याचा खुलासा सुलभ होईल.

बाबांचे समाधिमंदीर हें बाबांच्या अनुज्ञेनें मुरलीधर मंदीर होणार होतें.

' वाडा देऊळ होऊं द्या प्रकट । पुरवील अभीष्ट सकळांचें ॥ ३९–१३७
असा स्पष्ट दृष्टांत देऊन बाबांनीं स्वतःच्या देखरेखीखालीं समाधि मंदीर बांधविलें.

' देवा बापूसाहेब वदती । दाळनाच्या दोन्ही भिंती ॥
पाहूनि तेथें स्थापूं प्रीती । कृष्णमूर्ति मुरलीधरा ॥ १५६
' मध्यभागीं चौक साधून । करूं तिथें सिंहासन ।
वरी मुरलीधर विराजमान । शोभायमान दिसेल ॥ १५७

' ऐकूनि ही शामाची उक्ती । बाबा आनंदे बरें म्हणती ॥
प्रेमळ पूर्ण झालिया वरती । येऊं की वस्तीस आपणहीं ॥ ' १९९

बाबांनी मुरलीधराचे मंदीर बांधण्यास अ. ३९ परवानगी दिल्याचे वरील अवतरणांत स्पष्ट आहे. त्याप्रमाणें मुरलीधर मंदीर झालें. मध्यें चौक साधून सिंहासन झाले, पण तेथें मुरलीधर विराजमान होण्याऐवजीं आपला देहच बाबांनी तेथें निक्षेपिला व भक्तांस फक्त पादुकाअर्चन करण्याची मुभा ठेवली. यांत जसें बाबांनी स्वयमेव मुरलीधर असल्याचें प्रत्यंतर दिलें तसेंच मूर्तिपूजेऐवजीं पादुका-अर्चन करण्याचा बोध दिला. कां ? तें ओघानें पुढें येईलच ! मुळ मुद्दा ज्या बाबांनी राममूर्ति जरी स्वतः खरेदील्या असल्या तरी त्यांची स्थापना सहेतुकच केली नाहीं.

शिवाय ज्या बाबांनी ज्या श्री. तात्यापाटलांच्या करवीं शिरडींतील देवादेऊळांचा जीर्णोद्धार केला त्याच बाबांनी त्याच पाटलांच्या करवी राममूर्तिंची स्थापना कां केली नाहीं हा प्रश्नही विचारार्ह आहे.

" देवा देऊळांचेही जीर्णोद्धारा । बाबांनी अपार करविले " ३६
" शिरडीस तात्या पाटला हातीं । शनी, गणपती, शंकर पार्वती "
ग्राम देवी आणि मारुती । यांचीही सुस्थिती लाविली ॥ ३७ अ. ७

यांत विशेष म्हणजे बाबांना " विठ्ठल पूजनी आदर " [ ४.९६ ] होता, रामजन्मोत्सव त्यांनींच सुरू केला व त्यांत गोपाळकाल्याची प्रथाही त्यानींच पाडली. असें असतां वरील नामावळींत बाबांनीं रामाचे, कृष्णाचें वा विठ्ठलाचे मंदीर बांधविल्याचा निर्देश नाहीं. कां ? तर बाबा भागवत धर्मी होते व स्वयमेवच राम-कृष्ण-विठ्ठल होते. म्हणून त्यांना त्या अवतरांची आपणांवेगळी देवळें बांधविण्याची आवश्यकता भासली नाहीं. इतर देवळांचा जीर्णोद्धार त्याच बाबांनीं केला याचें कारण भागवत धर्म हा विष्णु उपासक असला तरी ' वासुदेवः सर्वं ' ही त्याची भावना आहे व इतर देवांचे त्याला वाकडे नाहीं. उलट कोणा देवाचेंही जो समभावनेने अर्चन करतो तोच खरा भागवत होय ! भागवतांनी महाशिवरात्रीचें व्रत अवश्य करावें अशी नाथभागवतांत स्पष्ट आज्ञा आहे. इतर देवांची देऊळें बाबांनीं बांधविली पण राम-कृष्ण-विठ्ठल मंदीर कां बांधविलं नाहीं याचा खुलासा हा असा आहे.

अर्थात् बाबांची समाधि हेंच शिरडींतील राम-कृष्ण-विठ्ठलाचें देऊळ ठरतें. यावेगळे तेथें निराळें राम-कृष्ण-विठ्ठल मंदीर उभारण्याचें प्रयोजन मला तरी पटत नाहीं. फार तर

मी असें सुचवूं शकेन कीं समाधि मंदिरांत श्रीबाबांची प्रतिमा मध्यभागीं ठेवून वाटल्यास तेथेंच अन्यत्र नव्हे दोन्हीं बाजूस राम व कृष्णाच्या मूर्तींची स्थापना करावी.

यावर कोणी आक्षेप घेतील कीं जर बाबा हे रामाचे अवतार होते हें तुम्हाला मान्य आहे तर मग वेगळे राममंदीर बांधण्यास विरोध कां ? सकृतदर्शनीं विरोध नसावा पण ! जरी आपण आपणांस भक्तश्रेष्ठ भावीत असलो, जरीं आपणांस बाबांनीं अव्याहत अव्दैत बोध दिला असला तरी अद्याप आपल्यांतील व्दैत निमाले नाहीं. तोंडाने आपण बाबा व राम एकच म्हणूं पण ' राम रक्षा ' म्हणून बाबांच्या प्रतिमेवर अभिषेक करतांना किंवा ' साई महिम्न ' म्हणुन राममूर्तिवर अभिषेक करतांना आपली वृत्ती बावचळेल हें मीं अनुमानानें लिहीत नाहीं. तोंडानें अव्दैत प्रतिपादन करणाऱ्यांचीं अशा समयीं त्रेधा कशी होतें हें कांहीं मान्यवर सद्भक्तांच्या बाबतींत प्रत्यक्ष पाहून मी लिहीत आहे. माझी स्वतःचीही अद्याप एवढ्या अव्दैतावस्थेप्रत प्रगति झालेली नाहीं ! म्हणून व्दैत भाव परिपोषक मूर्तिपेक्षां अर्चनास पादुका बऱ्या. बाबांच्या पादुकांवर रुद्राभिषेक किंवा दत्ताच्या पादुकांवर साई महिम्नाची एकादशणी करण्यास मन तेवढें कचरत नाहीं. कारण पादुका येथून तेथून सारख्याच. श्रीनृसिंहसरस्वतींनीं आपल्या निर्याण समयीं पादुकार्चन विधिच आदेशिला ! बाबांनी पण त्याचेंच अनुकरण करून स्वतःचीं समाधि बांधवून, कोणाचीही मूर्ति तेथें न स्थापवून अव्दैत बोधास सुलभ असा पादुकार्चनाचा विधि शिरडीस प्रस्थापित केला. व हें सर्व लक्षांत घेऊनच मी श्रीदासगणूंच्या राममूर्ति स्थापनेशीं सहमत होऊं शकत नाहीं.

कदाचित् कोणी म्हणतील कीं बाबांच्या जबाबावरून बाबा कबीर अतएव रामभक्त होते. स्वतः राम नव्हते ! तेव्हां बाबांचे उपासना दैवत जें राम त्याची स्थापना करण्यास प्रत्यवाय कोणता ? तर बाबा रामोपासक होतें कीं अल्लाचे उपासक होते हा आपला प्रश्नच नाहीं. त्यांच्या साधनाशीं आपणांस कांहींच कर्तव्य नाहीं. त्यांनी आपल्या उद्धारास आपणांस कोणता मार्ग दाखविला हाच आपला प्रश्न आहे. आणि त्यांनी दाखविलेला मार्ग म्हणजेः—

' एक मजकडे लक्ष देई । परमार्थ येईल हातास ॥ ७२

' तूं मजकडे अनन्यपाही । पाहीन तुजकडे तैसाच मीही ॥

माझ्या गुरूनें अन्य कांहीं । शिकविलें नाहींच मजलागीं ॥ ७३ अ. १९

शेवटी हा भावनेचा प्रश्न आहे ! 'व त्याचा बोध श्रीबाबांनीं गणुदासांसच केला आहे.

'नवी साडी ठेवली सदनीं । जरी आली फाटकें नेसूनि ॥
तरी ती दिसेना खिन्न मनीं । नव्हती कां उणीव साडीची ॥ ९१
'असमर्थपणें फाटकें लेणें । समर्थपणें ही तेसेंच करणें ॥
या नांव दैन्य संपन्नपणें मिरविणें । भावनें गुणें सुखदुःख ॥ ९२
हेंच तें गणुदासांचें कोडें । एणें परी जेव्हां उलगडे ॥
ईशावास्याचें कोणें सांपडे । ठायींच पडे अर्थ बोध ९३ अ. २०

—याच दृष्टांतानें बोलावयाचें तर श्रीरामचंद्राच्या मूर्ति या नव्यासाडी वत्रा आहेत म्हणून त्या बाबांनीं सदनी ठेवून दिल्या व नित्याचे फाटकें लेणें ज्या पादुका ते नेसून ते बाहेर भक्तसेवेस आले. हे जाणून साडीची–राममूर्ति स्थापनेची–उणीव भासण्याचे कारण नाहीं. नवी साडी नेसून–राममूर्तिसमोर कीर्तन करून जो आनंद लाभणार तोच आनंद फाटकें नेसून–समाधिसमोर लाधण्यास कोणताच प्रत्यवाय नाहीं. कारण 'भावनें गुणें सुखदुःख ॥' बाबांनीं आपणांस सर्वांस हाच ध्येयादर्श दिलेला आहे. व भक्तिचें अंतीम साध्य तेंच आहे.

'मावळला श्रम रामगुण गातां । उपासना आतां सोडूं नये ॥

असो. बाबांचें भक्तावर या प्रश्नाचा निकाल विचारपूर्वक काय तो करतीलच ! पण श्रीदासगणूं चरणीं माझी हीच विज्ञप्ति आहे कीं 'बाबांची उच्छिष्टें बोललों उत्तरें । काय म्या पामरें जाणीतलें ॥' हें जाणून यांतील न्यूनाधिकाबद्दल व अधिकारातिक्रमणाबद्दल मला त्यांनीं उदारबुद्धीनें क्षमा करावी.

जयदत्त !

पुणें ता० २९–५–४०

आपला,

सुमन सुंदर.

# श्री सद्गुरु साईबाबा



## पुण्यतिथि

क्. सा. न. वि. वि. आधुनिक संतचूडामणि सच्चिदानंद **श्रीसद्गुरु साईबाबा महाराज** संस्थान शिर्डी. ता. कोपरगांव जि. अहमदनगर यांची २२ वी पुण्यतिथि येत्या आश्विन शु।। ११ शके १८६२ शुक्रवार ( ता. ११-१०-४० ) रोजीं श्रीक्षेत्र शिर्डी येथें महाराजांच्या मंदिरांत होणार आहे. तरी या समयीं आपण कृपा करून आपल्या कुटुंबांतील बालगोपाळांसह व मित्र-मंडळीसह श्रींच्या तीर्थप्रसादास अवश्य यावें अशी नम्र विनंति आहे.

**श्री साईबाबा शिरडी संस्थान कमिटी मार्फत.**

ता. १५ सप्टेंबर १९४०
२७ चराई रोड, ठाणें.

आपला नम्र साईदास,
श्री. ना. खारकर,
ऑ. चिटणीस,
श्रीसाईबाबा सं. क.

## —कार्यक्रम—

### आश्विन शु॥ १० शके १८६२ गुरुवार [ विजयादशमी ]
### १०–१०–४० प्रारंभदिन

सकाळी श्रींचे समाधीवर रुद्राभिषेक, मंगल स्नान, वस्त्रपरिधान व षोडशोपचार पूजा नंतर नैत्यिक आरति.

दुपारी भोजन व कीर्तन.

सायंकाळी सीमोल्लंघन नंतर नैत्यिक आरति व भोजन.

रात्री चावडी व शेजारति.

### आश्विन शु॥ ११ शुक्रवार ता. ११–१०–४०
### पुण्यतिथिदिन

पहांटे श्रींच्या समाधीवर रुद्र व पवमान अभिषेक.

सकाळीं भिक्षा, नंतर समाधीस मंगल स्नान, पूजा, वस्त्रपरिधान वगैरे नंतर पुण्यतिथि कीर्तन व नैत्यिक आरति.

दुपारी पुण्यतिथि–आराधनाविधि, तीर्थप्रसाद, फराळ, भोजन व नंतर नैत्यिक पुराण.

सायंकाळी नैत्यिक आरती, नंतर भोजन, रात्रौ रथाची मिरवणूक, गारुड व शेजारति.

### आश्विन शु॥ १२ शनिवार ता. १२–१०–४०

सकाळीं अभिषेक, स्नान, पूजा व नैत्यिक आरति.

दुपारी फराळ व भोजन व नंतर नैत्यिक पुराण.

सायंकाळीं नैत्यिक आरति व नंतर फराळ व भोजन.

रात्रीं कीर्तन पालखीची मिरवणूक व शेजारति.

### आश्विन शु॥ १२ रविवार ता. १३–१०–४०

सकाळीं अभिषेक, स्नान, पूजा व नैत्यिक आरति.

दुपारीं फराळ व भोजन व नंतर नैत्यिक पुराण.

सायंकाळीं नैत्यिक आरती व नंतर फराळ व भोजन.

रात्रीं कीर्तन पालखीची मिरवणूक व शेजारति.

### आश्विन शु॥ १३ सोमवार ता. १४–१०–४०

सकाळीं नित्य कार्यक्रम व काला कीर्तन, दुपारीं भोजन व पुराण. सायंकाळीं–आरति भंडारा भोजन. रात्रीं शेजारति.

---

सूचना—वरील कार्यक्रमामध्यें जरूरीप्रमाणें फेरफार केला जाईल.

वर्गण्या, देणग्या, वगैरे संस्थानचे सेक्रेटरी व ट्रेझरर श्री. एस्. एन्. खारकर, ३७ चराई रोड, ठाणा आणि जॉइंट ट्रेझरर व एडीटर साईलीला श्री. रा. बा. चैसास, गोखले रोड, नार्थ, दादर, यांचेकडे देऊन पावत्या घ्याव्यात.

# Announcement

The 22nd Anniversary (Punya Tithi) Utsava for the Shake Year 1862 of Shri Sadguru Sai Baba will be celebrated, at His Shrine at Shirdi, Taluka Kopargaon, District Ahmednagar. All Sai Bhaktas are invited to attend and partake in the celebration, which will commence from Friday the 11th October 1940 and terminate on Monday the 14th October 1940.

Contributions, gifts etc. should be made through:–, The Hon. Secretary and Treasurer:-Mr. S. N. Kharkar 37, Charai Road, Thana and Jt. Treasurer & Edito Sai Lila Mr. R. V. Ghaisas, Lk. Tilak Jubilee Trust Bldg Gokhale Road, North Dadar, who will issue Sansthan receipts.

S. N. Kharkar.

*Hon. Secretary.*

**Shri Sai Baba Shirdi Sansthan.**

Dated 15th September 1940
37 Charai Road, Thana.

# संस्थानवृत्त.

संस्थान कमिटीनें कामाचे उरकाकरितां नेमिलेल्या संस्थान कमिटीच्या सब कमिटीची पहिली सभा ता. ८ सप्टेंबर १९४० रविवार रोजीं दोन प्रहरीं रा. बा. मो. वि. प्रधान संस्थानचे एक विश्वस्थ यांचे बंगल्यांत भरली होती, तींत पुढील प्रमाणें खुलासा भक्तांचा गैरसमज दूर होणेंकरितां लौकर प्रसिद्ध करावा असें ठरलें:—

' श्री. रा. रामचंद्र वासुदेव चैसास, संस्थानचे जॉइंट ट्रेझरर व श्री साईलीलेचे संपादक यानी शिवपुरी येथील साईनाथ सेवा संस्थेची खजिनदारी पतकरिली होती, तिचा त्यानीं राजीनामा दिला आहे, शिवपुरीची संस्था मद्रास व इतर ठिकाणचे बाबांचे भक्ती संस्थेप्रमाणें एक स्वतंत्र संस्था आहे व तिचा शिरडी संस्थानशी कोणताहि आर्थिक संबंध नाहीं. '

श्री. ना. खारकर.
ऑ. चिटणीस.

## श्री साईबाबांचे भक्ती प्रचार कार्य

मद्रासचें बाजूस बाबांचे भक्तीची लाट अलीकडे दोन वर्षापासून सुरू झाले पासून संस्थानला आर्थिक मदत होत आहे; परंतु त्याबरोबरच संस्थान ऑफीसचे कामाची बेसुमार वाढ झालेली आहे व तिला तोंड देणेचे संस्थान कार्य वाहकांचे शक्य ते प्रयत्न चालू आहेत.

त्या प्रांतांत चालू भक्ती ओघ पाहून सद्गुरूंचे अगाध व अतर्क्य शक्तीचे कौतुकच वाटते. परंतु खेदाची गोष्ट कीं बाबां विषयींचे सर्व वाङ्मय मराठींतच उपलब्ध असलेमुळें व चालू आंग्ल भाषा प्रचारकांकडून त्यांचेच कांहीं बाबतींत गैर समजुतीचे शब्द झालेमुळें बाबांच्या लीलारूपी शिकवणुकीची योग्य जाणीव तिकडील भक्तांस मिळत नाही. त्यामुळें कांहीं बाबतींत त्यांचा गैर समज व एक तऱ्हेची फसवणूक कशी होत आहे याचा एक दाखला म्हणून पुढील पत्र व्यवहार प्रसिद्ध करणेंत येत आहे. या बाबतींत नमूद करणेस समाधान वाटते कीं त्या बाबतींतील संस्थानची विचार सरणी मद्रास प्रांतांतील आद्य भक्तवर्य रा. सा. बी. पापयाचेटी यांस पसंत पडून चिटणीसांकडून केला गेलेला खुलासा ते त्या प्रातांत नवीनच बाबा भक्ती प्रचारार्थ सुरू झालेले साई सुधा नांवाचे मासिकांत तमाम दक्षिण हिंदुस्थानांतील भक्तांचे माहिती करितां म्हणून प्रसिद्ध करणार असलेचे कळवितात.

Dear Mr. Kharkar,

Many thanks for your kind letter dated the 26th instant. The same is receiving my attention and I have instructed the matter to go into the "SAI SUDHA" next month as the present one is almost under completion.

It is long since I had the pleasure of hearing from you and, hope to do so now and then. we are all doing wel here by Sri Sai's grace and hope the same with you.

Yours sincerely,

B. PAPAIYA CHETTY.

---

Office of the Shirdi Sansthan,
of Shri Sai Baba,
37, Charai Road,
Thana, 26 th August. 1940.

To,

C. Chakravarthi Aiyangar, Esqr., B. A., B. L., Vakil.
VELLORE.

Dear Mr. Aiyangar,

Your letter of the 6th inst. Kindly excuse me for not replying you earlier. The reason was that it required some consideration as will be seen the from following:—

2. You desire that the letter to Abdulbhai accompanying yours should be translated, its contents explained to him and his answers to the several questions of your friend Mr. Vaidyanathan should be forwarded to you.

3. In the first place let me tell you for your information that the Sansthan has now engaged and stationed at Shirdi an English knowing clerk by name Mr. R. B. Bhate ( who is also a devotee of

Baba ) to serve the needs of those who do not know Marathi, the local language of Shirdi. Your letter can therefore be merely forwarded to Mr. Bhate who can act up to your wishes. But before this is done I would like to explain to you, as a devotee of Baba and for that matter a friend and a well wisher of all other साईभक्तांस, the peculiarities of the teachings of Baba which, I fear, have not been properly known to you or many in South-India. This is not your fault. It is bacause Baba's preachings which have been collected and enumerated in a book called the सच्चरित compiled by the late Mr Govind Raghunath Dabholkar is written in verse in Marathi. This compendium was written by him with Baba's permission and solely at His inspiration. As it is written in Marathi it is a **sealed** book to you all who do not know Marathi, and so far I believe it is the only authentic biggest compendium of experiences about Baba and His preachings. Though this book purports to deal with Baba and His keachings from the Hindu points of view, Baba's mission in life being that of universal brotherhood his teachings are such as to be of common acceptance to all the schools and in that respect it is a standard book like Gita which contains the teachings of Lord Krishna. A time may come when any of his devotees would render it in English or Hindi to meet the needs of those who do not know Marathi.

4. Since you have written this letter to me I believe Baba has thrown the burden on me to enlighten you or certain points as well as lies in my pen and power.

5. Sai Baba has no disciple in the sense as other मठाधिपति have. He has not nominated any one to succeed Him to His Gadi if you imagine such a one, act or officiate for Baba. I might give here some of the quotations of Sai Baba.

(1) I shall be ever active and vigorous even after leaving this earthly body.

(2) My tomb shall bless and speak to the needs of my devotees.

(3) I shall be active and vigorous even from the tomb.

(4) My mortal remains would speak from the tomb.

(5) I am ever trying to help and guide all who come to me who surrender me and who seek refuge in me.

(6) If you look to me, I look to you.

(7) If you cast your burdon on me, I shall surely bear it.

(8) If you seek my advice and help it shall be given to you at once.

(9) There shall be no want in the house of my devotees.

6. It is given in the सच्चरित that once Baba got wide with a devotee for asking of another devotee what advice Baba had given him for his benefit, because Baba said that He himself was ever ready to answer to all the questions of His devotees that may be put to him, and none need go for that purpose to a third person.

7. Baba preached **Self-help and patience.** Once he said " you exert as much it is in your own power and I am standing in front of you with a cup of milk for you ( to give you greater strength and energy ).

8. Things which looked impossible have occurred through the grace of Baba through administering or application of his Udi. This however does not mean that His devotees should shirk the part they themselves have to play i. e. to do their best as any other prudent man would behave in the prevailing circumstances. Baba always asked His devotees to have faith in him and wait for the fruits patiently as things have to come in their proper time.

9. Baba has not any particular ways to guide His devotees Sometimes he would give a hint through the chance conversation of even strangers among themselves. One may by chance pick up a book, open it and get an answer or hint there to solve one's problem. If need be he may give a दृष्टांत in a dream. So no

one can fathom what means He may employ to communicate with His devotees . But be sure that Baba is always by the side of his devotees to give them help and guidance. It is even not necessary to come to Shirdi for doing Homage to his shrine. By all means it is desirable for anyone to go there if he has time and means to do it, for Baba once scolded one devotee for borrowing money for coming to Shirdi.

10. The gist of Baba's preaching is that he asks his devotees to go on doing their normal duties and assures them that He is always by their side to assist and guide them in their honest undertaking and solve their difficulties and tide over their sufferings. But all this depends on the density of faith one has in Baba.

11. To us, i. e. Baba's devotees in this Province, the idea of using any intermediary such as Abdulbhai is very ridiculous and I found it my duty to bring this to your notice. I do not wish to lower Abdul Bhai's devotion towards Baba in your eyes, but such a procedure as occurs to you is sure to give a false hope to those who are ignorant of Baba's teachings and you are likely to be misled.

12. It will, therefore, be clear that is not necessary to employ any third person as an intermediary to get Baba's answers to any question of His devotees. No one does this on this side. Abdul Bhai is as much a devotee of Baba as any other devotees of Baba since Baba himself assured that he is always by the side of His devotees and able to respond to their prayers by whatever means, He may choose, it is futile approaching any other person such as Abdul Bhai to get answers to your friend's querries.

13. In spite of this if you wish that Abdul should be consulted I will send your letter to Mr. Bhate for the purpose.

Yours sincerly
S. N. K.

# शिरडीवृत्त

## आगष्ट १९४०

या महिन्यांत मद्रास, सिकंदराबाद, मुंबई व पुणें येथून भक्त मंडळी श्रींचे दर्शनास येऊन गेली.

श्रींचे समाधीवर याही महिन्यांत दररोज भक्तांचे अभिषेक व अर्चनें, पूजा नैवेद्य वगैरे झाले व कांहींनी श्रावण मासानिमित्य नैमेत्तिक ध. कृ. करविली व कांहींनी गरीबांस अन्नदान केलें व नंदादीप लाविले.

श्री. बी. एन्. विश्वनाथ, ७४ लॉइड रोड, रॉयपेटा मद्रास यानी चांदीची समई (वजनभार ५० ) ची श्रीस आर्पण केली.

श्री नामदेव पुण्यतिथी, सावतेबुवा, दोन एकादशा, कृष्णजयंती व गोपाळ काला अशीं कीर्तनें सं. गवयांची श्रीचे मंदिरांत झालीं. तसेंच एक कीर्तन श्री. विश्राम बुवांचे झालें.

श्री गोकुळ आष्टमी उत्सवांत श्रीस मंगलस्नान, रात्रौ जन्मोत्सव दुसरें दिवशीं भंडारा भोजन, रात्रौ रथाची मिरवणुक व तिसरें दिवशीं सकाळीं गोपाळ काला वगैरे कार्यक्रम झाला. हवापाणी उत्तम आहे.

श्री. ना. खारकर.
ऑ. चिटणीस.

---

## " SHREE SAI BABA SARVAJANIK CHARITABLE DISPENSARY "
## Chikhalwadi, Grant Road, Bombay 7.

Annual meeting of the executive Committee of the above dispensary was held on 11 th Sunday August 1940 at Santacruz, at the residence of Rao Bahadur M. W. Pradhan B. A. LL. B., J. P., Ex. M. L. C. Vice-president Bandra Municipality, the Chairman of the Committee, who presided and Dr. K. R. Thakkar, the Vice Chairman of the Committee, submitted the yearly account

which was unanimously passed and declared the following number of patients treated in the Dispensary:-

| | |
|---|---|
| Total Number of patients till 8 th April 1940. | 5644. |
| Hindus. | 3242. |
| Mahomedens. | 1376. |
| Christians. | 836. |
| Parsis. | 194. |
| Patients treated quite free. | 1260. |
| Hospital aided patients. | 1006. |
| Maternity cases done free at the residênce of patients. | 5. |
| No. of expectant mothers visited by Miss Kettabai. the Secretary of tne Executive Committee. | 24. |
| The average daily attendance of Patients. | 43 |

Rao Bahadur Pradhan made a special mention of Mr. Jehangirji Framji who, he said, was silent Bhakta of Sai Baba and was for the most part responsible to keep this dispensary a going concern with the munificient secret and silent gift he made to this dispensary. And thanked him very much for his so kind and generous feelings towards this Dispensary.

Next Rao Bahadur Pradhen made special reference of Dr. S. S. Ugrankar M. R. C. P. (London) Hon Physican to Sir J. J. Hosp. without whose support, he said, this dispensary could not have made such a rapid progress. This Committee also congratulated Dr. S. S. Ugrankar for his splendid success at the University senate election. And last But not the least work done by Nurse Miss Kettybai, the secretary of the Committee, was highly appreciated and Recorded by the Chairman for having attende for poor maternity cases and exspecatant mothers at their residence as shown above, quite free of charges on behalf of this Dispensary. Also Mr. "X" was thanked very much for the silent donation he gave to the Dispensary during the year and the Meeting after the light refreshment dispersed.

# अनुभव

## " बाबांचा श्रीसाईप्रधान लेंडीबाग " व त्यांतील लहानशी विहीर याविषयीं खुलासा

प्रिय नाना साहेब खारकर प्रेमपूर्वक सा. न. वि. वि.

आपले ता. २३–८–४० चे पत्र आतांच " गोविंदा गोपाळा " मंडळी आपल्या वाडींत दह्याची हांडी फोडून वाड्याच्या बाहेर पडतात इतक्यांत पोष्टमनने हातीं दिले. पत्र वाचून बाबामय सर्व जगत आहे ह्याची क्षणोक्षणी खात्री होत चालली आहे त्यांत भर पडली. नांवाबद्दल त्वरीत बाबांचा हुकूम घेतला. त्यांत आपण प्रथम लिहिल्याप्रमाणें " श्रीसाई प्रधान लेंडी बाग " हेंच नांव बाबांनीं मंजूर केलें. बाबा " परधान " या नांवानें जरी संबोधित होते तरी पाटीवर " प्रधान " हेंच त्यांना पसंत पडलें हे उघड आहे.

मी १९१० मेच्या अखेरीस प्रथम शिर्डीस गेलो. बाबांचे दर्शन घेऊन त्याच दिवशी अगर दुसऱ्या दिवशीं निघून इतर मंडळी प्रमाणें परत यावयाचें असा संकल्प होता. पहिल्याच खेपेस बाबांनीं ८ दिवस ठेऊन घेतले. दुसऱ्या दिवसापासून सकाळीं आज्ञा मागावयास गेलों किं सांगत " काय आपण रानांत आहों, जाऊं संध्याकाळीं " संध्याकाळीं गेलो किं सांगत " उद्यां पाहूं " असे करून ८ दिवस मला शिर्डीतून दूर केले नाही.

पण दुसऱ्या दिवशीं बाबा मला म्हणालें कीं, " भाऊ हे पहा माझें अर्धांग एकदम राहून गेले आहे, पण कांहीं नाहीं आज उद्यां बर होईल. " पण त्या बोलण्याचा त्यावेळीं मला कांहीच बोध झाला नाही. कारण ज्या आईनें मी शिर्डीस प्रथम जाण्यास निघते वेळीं शिर्डीत नेण्याचा फळाफुलांचा करंडा भरला, ती आई तिसऱ्या दिवसापासून अर्धांग वायूच्या पहिल्या फटक्यानें आजारी झाली असेल असे माझ्या स्वप्नींहि नव्हतें. तेव्हां बाबा बोलले कीं, " माझे अर्धांग एकदम राहून गेले आहे पण कांहीं नाहीं आज उद्यां बरें होईल. " ते माझ्या आईच्या एकाएकीच्या दुःखण्याबद्दल बोलले व ती आज उद्यां बरी होईल असाही आशिर्वाद दिला हा खुलासा मी मुंबईत परत आल्यावर

मला पटवून दिला. श्री. माऊली बाबांच्या सर्व लीला फक्त माझेबद्दल जर लिहिल्या तर एक मोठें महाभारतच होईल व तसे बाबांच्या दरएक भक्तास वाटत आहे. हीच अगणित लीला व अगाध शक्ती बाबांची.

त्या आठवड्यांत मुंबईत माझ्या मातोश्रीची तब्येत अतिशय बिघडून तिची स्थिती अत्यंत काळजीदायक झाली होती. तरी पण नानासाहेब चांदोरकर हे त्यावेळीं "ठाणा प्रांत" होते व रोज त्यांचें वास्तव्य मुंबईत रा. सुंदरराव नवलकराच्या प्रिन्सेस स्ट्रीट मधल्या जुन्या घरांत असे. नानासाहेबांनीं आमच्या जुन्या हनुमान गल्लीतल्या घरांत म्हणजे जेथें माझी आई फार आजारी झाली होती व जिची डॉक्टर मंडळीनें आशा सोडली होती, तेथें सर्वांस असें सांगितले कि मोरेश्वररावांना तुम्हीं तार वगैरे करून बोलवूं नका. जोपर्यंत मोरेश्वरराव तेथें आहेत व बाबा त्यांना येण्याची परवानगी नाकारीत आहेत तोपर्यंत तातीबाईंना (म्हणजे माझ्या आईला) कांहींच धोका नाहीं. व तेंच खरें ठरलें. मी ज्या दिवशीं परत आलों त्याच दिवशीं अकल्पीत मनमाडास मला पंजाब मेलला उशीर झाल्यामुळें मिळाली व मी रात्री ९ वाजतां येण्याऐवजीं दुपारीं ५ वाजतां आलों. आईची आशा सोडलेल्या मंडळी समक्ष बाबांचे पादतीर्थ (शिर्डीहून पाद तीर्थ आणण्याची ती पहिलीच वेळ व ती नानासाहेब चांदोरकरांच्या बापूची कल्पना. त्यानें तीर्थ घेतलें व तसें मीही घेतलें) आईस पाजलें व उदी लावली व त्यानंतर एक तासाच्या आंतच तिची प्रकृति कल्पनेच्या बाहेर सुधारत जाऊन ती त्या भयंकर दुखण्यांतून बरी होऊन त्यानंतर १॥ एक वर्षांनीं बाबांच्या आशिर्वादीय बाबू नांवाच्या माझ्या मुलांबरोबर साईबाबांचे दर्शनही घेऊन आली व त्यानंतर दोन वर्षांनीं कैलासवासी झाली. अस्तु.

प्रथमच्या ८ दिवसाच्या भेटींत एका गुरुवारीं बाबा लेंडीवरून परत येऊन १ तास झाला होता त्यावेळीं मी व नानासाहेब चांदोरकर यांचे दोन मुलगे बाबू व बापू बाबाकडे गेलो. पाय चेंपणें वगैरे चालू असतां बाबा मला म्हणाले "भाऊ" (त्यावेळीं मला "भाऊ" असे संबोधित व पुढें पुढें "परधान" असे शेवटापर्यन्त संबोधित.) चल मज संगाती व एकदम उठले व बाबा, मी, बाबू व बापू असे चौघेजण एकदम लेंडीकडे गेलों. बाबांचें टोपरें त्यांच्या हातीं होतें. लेंडीकडे अशा भलत्याच वेळीं बाबा जातील असें कोणाच्या स्वप्नांत नाहीं, कारण मे महिना, व भर दोनप्रहर. तेथें लेंडीवर त्यांच्या वटवृक्षाखालीं जाऊन बाबा उभे राहिले (त्यावेळीं लेंडी हे ठिकाण म्हणजे एक ओसाड पडीक जमीन) व म्हणाले "भाऊ इकडे ये" बाबानीं त्यांच्या खिशांत हात घातला व कांहीं दाणे माझ्या हातीं दिले व म्हणाले, "हे घे व तूंच हे दाणे या जागेवर फेंक." व स्वतः टंबरेलातुन थोडें पाणी आणलें

होतें तें त्यावर शिंपडूं लागले. इतक्यांत बाबा आम्हांस घेऊन लेंडीवर गेल्याची बातमी गांवांत पसरली व मंडळी जमली त्यांना बाबा म्हणाले " चाला या दाण्यावर पाणी " तेव्हां बऱ्याच मंडळींनीं त्यावर पाणी घातलें व बाबा आम्हां तिघांस घेऊन मशिदींत परत आले. ह्या बाबांच्या कृत्याचा अर्थ कोणासही त्यावेळीं नीट उमगला नाहीं. बाबांची महती दिवसेंदिवस जगभर पसरत चालली. लेंडीवर बाबांचें जाणें म्हणजे एक वाजत गाजत मिरवणूक होऊं लागली. सर्व मंडळींनीं वाजत गाजत सकाळीं ९॥-१० च्या सुमारास बाबांस लेंडिवर घेऊन जावयाचें. तेथें बाबा गेल्यावर सर्व मंडळी परत येऊन, सकाळचा फराळ वगैरे करून १०॥-११ च्या सुमारास सर्व मंडळी बाबांस लेंडीवरून वाजत गाजत आणण्यास जावयाची व बाबांना मशिदींत आणून पोहचवावयाची. ही पद्धत सुरू झाल्यावर बऱ्याच काळानें म्हणजे सन १९१८ चा मे महिना, म्हणजे ज्या वेळीं मी एक आठवडा घरच्या सर्व मंडळी बरोबर शिर्डीस येतो असें बाबांस कळविल्याबरोबर, बाबांनीं बापूसाहेब बुटींना असें सांगितलें कीं, " बापू साब आपले परधानचे मंडळीस तुझे वाड्यांतल्या अमुक अमुक खोल्या साफ करून दे.' म्हणजे वाड्याच्या दक्षिण भागच्या खोल्या. अर्थांत आम्हीं सर्वजण शिर्डींत गेलों. बाबांच्या हुकुमाप्रमाणें त्या खोल्यांत उतरलों. आम्ही पोहोंचेंपर्यंत बाबा लेंडीवर जाण्यास उठले नाहींत. मशिदींत गेल्याबरोबर व माझ्या कुटुंबानें बाबांच्या पायावर डोकें ठेवल्या-बरोबर बाबा सर्व मंडळीस म्हणाले, " पहा लेकराबाळांना घेऊन येऊन मला ही भेटली. " त्यावेळीं त्या बोलण्याचा अर्थ कांहीं उमगला नाहीं. त्याखेपेस बाबानीं एक महिनाभर आम्हांस शिर्डींत ठेऊन घेतलें. व दररोज लेंडींत जाते येते वेळीं आमच्या खोल्यांत डोकावून पहात. त्याच दिवशीं सर्व मंडळी बरोबर मी लेंडीवर बाबांस पोंहोंच-विण्यास गेलों. सर्व मंडळी बाबांस एकामागून एक नमस्कार करून लेंडीच्या हद्दीबाहेर निघाल्यावर अर्थात मीही त्या मंडळींत होतों, बाबा एकदम मोठ्यानें हांक मारून म्हणाले " परधान इकडे ये " सर्व मंडळी तटस्थ लांब उभी राहिली व बाबा औदुंबरा-खालीं उभे राहून मी त्यांचे पुढें उभा राहिलों. बाबानीं दोनतीन वेळां मिशीवर ताव दिला, व छातीवर तसाच हात मारला, व उजवा हात माझ्या खांद्यावर ठेऊन मला कांहीं आज्ञा केली, व कांहीं बोलले. मला त्यावेळीं स्वर्गसुखाचा भास वाटत होता. व हा प्रकार लेंडीवर म्हणजे प्रथम शिर्डींत आल्याबरोबर दाणें लेंडीत पेरण्याचा अजब देखावा व ज्यावेळीं ' लेकरांबाळांना घेऊन येऊन मला ही भेटली. " ती माझ्या घरच्या मंडळीची व बाबांची शेवटली भेट, त्यावेळीं वरील अपूर्व देखावा बाबांनीं मजबरोबर सर्व भक्त मंडळासमक्ष लेंडीवरच दाखवला. ती जागा, तो हल्लीचा बाग. त्या जागे-

करितां मला जवळ जवळ १२०० रुपये खर्च झाला, पण श्री. तात्याजी गणपतराव पाटील कोते यांच्या मदतीनें ती जागा मला मिळाली व श्री. सगुण नाईक यांच्या मेहनतीनें तेथें बाग झाला. त्या बागेसाठी बाबांचे बरेच भक्तांनी नाना तऱ्हेचीं फळफुल झाडें आणून लावली व तो बाग शिर्डीत एक उत्तम स्थळ होऊन राहिलें आहे. त्या लेंडीच्या जागेंत बाबांच्या हयातींत त्यानी स्वहस्तें व सर्व लहान मोठे भक्त मंडळीकडून एक एक दगड उचलवून तेथें एक विहिर केली, त्या विहिरीचे पाणी म्हणजे एक महातीर्थच होऊन गेले आहे व त्या पाण्याच्या रोगनाशक शक्तिबद्दल बरेच लोक तारीफ करीत आहेत.

अशी ही त्रोटक हकीकत " लेंडी " बद्दल आपणास बाबांच्या प्रेरणेनें कळवीत आहे. कारण सविस्तर लिहिणें म्हणजे फारच मोठा लेख होईल.

न्यायाच्या दृष्टीने ज्यानीं ज्यानी सभामंडपाकरितां जागा विकत घेऊन दिल्य आहेत त्या त्या जागांवर अर्पण करणारांच्या नांवाच्या पाट्या असणें अवश्य आहे. आपली काम करण्याची शैली, आंगमेहनत व बाबांवरील निस्सीम भक्ती पाहून अत्यंत आनंद वाटतो. क. लो. हे. वि.

आपला नम्र,

मोरेश्वर विश्वनाथ प्रधान.

## संस्थान चिटणीसांस कळविणेंत आलेले अनुभवः—

(१)

विलेपार्ले येथील एक ग्रहस्थ कळवितात कीं गेले रामनवमीचे अगोदर आपणांस बाबांचे आकर्षण झालें व ध्यानीं मनीं नसतां उत्सवास शिरडींत जाणें घडलें. त्या एकंदर घडून आलेलें योजनेंत बाबांचे लीलेचा जो अनुभव आला व आनंद प्राप्त झाला तो तर अवर्णनीयच आहे. परन्तु बाबांची भक्ताची श्रद्धा वाढविणेची हातोटी कांहीं अगम्य आहे असें निदर्शनास आले ते असें:—

शिरडींत दर्शनलाभ होऊन उत्सवांत आनंदलाभ झाला. परत निघणेचे वेळीं वाहनाचे अभावी निघणें विषयीं अनिश्चिततेमुळें मन उद्विग्न झालें. निघणेचा मनास सारखा ओढा लागून तातडीनें कशी बशी मोटारींत जागेची सोय झाली. मोटारींत एक ग्रहस्थ वारंवार हातांत असलेले तारेकडे पाहात अस्वस्थ असलेले भेटले. चौकशीकरितां कुटुंब बेळगांवीं अत्यवस्थ आहे व रजेचे अभावीं तिकडे तातडीनें जात आहे वगैरे खुलासा कळला. झालें. बाबांनीं प्रेरणा केली व मी त्यांना शिरडींतून निघतांना बाबांचे धुनींतील बरोबर प्रसाद म्हणून घेतलेले उदींतील उदी व त्याबरोबर स्वतः करितां म्हणून घेतलेला एक लहान बाबाचा फोटो दिला व सांगितलें कीं मुक्कामी पोहचतांच बायकोस

उदी लावा व वाटेंत या फोटोची प्रार्थना करा व काय अनुभव येतो तो पहा. मला वाटतें या ग्रहस्थाचे करितांच बाबांनी माझी ऐनवेळीं या मोटारीनें निघणेची घटना केली. असो. आश्चर्याची गोष्ट कीं त्या गृहस्थाचें मी दिलेले पत्त्यावर १५ दिवसानीं पत्र आलें कीं बायको मरणोन्मुख असलेली बरी झाली. दर गुरवारीं फोटोस हारफुलाची सेवा सुरू आहे. हा मजकूर वाचून मनास काय वाटलें असेल त्याची जाणीव माझे सारखे बाबांनीं नवीनच आकर्षिलेले भक्तांस योग्य तऱ्हेची होईल. असो. अगाधलीला, अगाध शक्ती त्या सद्गुरूरायाची.

( २ )

अंधेरी येथील बाबांचे भक्त असलेले डॉक्टर यांचेकडे एक बाई आपले मुलांस एक पुळी झालेली दाखविणेस आली व सागूं लागली कीं ही पुळी बरीच होत नाही. डॉक्टरांचे हातून ती पुळी कापणेचे अजाणतपणे घडून आले व मुलगा बेशुद्ध पडला, हाताजवळील नर्स बोलूं लागली डॉक्टर हें काय केलेंत मुलगा मेला ना ? मुलाचे आईनें टाहो सुरू केला. डॉक्टराना त्रिभुवन आठवलें. परन्तु बाबांचीच कृपा कीं अशा आणि-बाणीचे प्रसंगीं ते भक्तांस आपली जाणीव होऊं देतात व तसें झालें तर लागलीच मदत करणेंस हाजर होतात. डॉक्टरांना बाबा आठवले व लागलेच सुचलें तें इंजेक्शन त्यानीं मुलास दिलें. पंधरा मिनिटांनीं मुलगा शुद्धीवर येऊन रडूं लागला. लागलेच डॉक्टरानी मुलाला आपले मोटारींत घालून मुंबईंत तज्ञ डॉक्टरांचेकडे सल्ला घेणेस घेऊन गेले. त्यांचे खुलाशांत पुळी काळपुळीचे जातीची होती व कापणें गैर झालें व वेळींच योग्य उपाय योजना झालेमुळें अपघात टळला वगैरे आढळून आलें. पुढें योग्य उपाय वगैरे होऊन मुलगा सुखरूप आहे. परन्तु बाबांनीं ऐनवेळीं आपणांस आपत्तींतून कसें बचावलें हा आपला अनुभव डॉक्टर मजकूर सांगतात. त्याचप्रमाणें आलिकडेच त्यांचे स्नेह्यांचे कडून एक लहानसे चांदीचे बाबांचे लॉकेट या डॉक्टरांचे हातीं आलें. ते आपले कुटुंबास देणार होते. परन्तु प्रथम ते तूर्त आपलेच जवळ ठेवणेचें ठरविले. झालें तेच दिवशीं त्यांचे मोटारीस आकसीडंट झाला व ते स्वतः अचानक वाचले. तोंच खिशां-तील तेच दिवशीं हातीं आलेलें लॉकेटची आठवण झाली व वाटलें कीं बाबा भक्तांचे रक्षणाकरितां अगाऊ योजना कशा करितात व कसे हजर राहतात. असो.

## साईसुधा आगष्ट महिन्याचे अंकावरून अनुवाद.

(१)

एक 'क्ष' लिहीतात कीं आपली मूळचीच भक्तीमार्गाकडे प्रवृत्ती असलेमुळें आपण दक्षिण हिंदुस्थानांतील सर्व देवस्थानास दर्शनाकरितां जाऊन आलेलों आहों. सर्वसाधारण

गरीबांस शक्य ती मदत करणेंकडे जन्मतःच मनाची प्रवृत्ती आहे. स्वामी रामकृष्ण व विवेकानंदादी महात्मे पुरुषांविषयीं एका वकील स्नेह्याबरोबर आमची नेहमीं चर्चा चालत असे. ह्या स्नेह्यांना माझे उन्नतीविषयीं फार आस्था आहे. ते जरी श्रीसाईबाबांचे भक्त होते तरी त्यानीं जुलै १९३९ पर्यंत या गोष्टीची कधींच जाणीव दिली नाही. परंतु ता. १ जुलै १९३९ चे दिवशी आमचे बोलणें चाललें असतां त्यांचेकडून प्रथमच मला बाबांचे नांव, त्यांची आगाध शक्ती, ज्ञान, व त्यांचे ठिकाणी एकंदर मानवाबद्दल दिसून आलेले वात्सल्य प्रेम याची माहिती कळली व घरीं येताच ती हकीकत आपण आपले बायकोस निवेदन केली. त्याच रात्रीं बाबानीं आपले स्वप्नांत दर्शन दिलें. त्यामुळें भाव वाढला. आपले बायकोचे पायांवर गळवांचा आजार पुष्कळ दिवसांचा होता व तो पुष्कळ डॉक्तरी वगैरे उपायानीं बरा होत नव्हता. त्यावर आपण आपले बायकोस उदी लावणेस सांगितलें. ती उदी लावूं लागली परंतु आमचे जवळ पुष्कळशी उदी नव्हती. तिनें बाबांचा उदीसाठीं धावा सुरू केला व आश्चर्याची गोष्ट कीं लागलीच राहते येथुन आमचे हाती एक उदीचे बंडल आलें. आम्ही कोठूनही न मागवितां ते मिळाले तेव्हां हा बाबांचाच चमत्कार असें आम्ही समजलों. हल्ली बायकोचा पाय साफ बरा झाला आहे व आमची बाबांचे ठिकाणी पूर्ण श्रद्धा बसली आहे. बाबांचे भक्तीस लागले पासून मनास समाधान लाभलें आहे. अशा या अतर्क्य अनुभवामुळें बाबा हे अवतारी पुरुष होते केवळ सत्पुरुष मालिकेंतील नव्हेत असे आपले ठाम मत झाले आहे. ता. २७।११।३९ ला आपण बाबानीं आपणांस सदेहरूपानें तीर्थ द्यावें म्हणून प्रार्थना केली असतां स्वप्नांत साक्षात येऊन तीर्थ व थोडा गुडप्रसाद दिला. येणेप्रमाणें बाबांचे आमचेवर सारखें कृपाछत्र आहे व हा अनुभव फक्त सहा महिन्यांत लाभला आहे. यांत एक आक्षरही पदरचे नाहीं हे बाबा जाणतातच.

(२)

मातोश्री वेंकटा सुबलक्ष्मी अम्मल उर्फ अम्मालू आम्मल, कै. व्ही. व्ही. चेलप्पा शास्त्री, जे एक बाबांचे निस्सिम भक्त होते त्यांचे कुटुंब, या ता. २६ जून १९४० रोजीं परलोकवासी झाल्या. तीन दिवस आगोदर यांचे घरीं मोठे तैल चित्राचे उद्घाटनाचा व पादुका स्थापनाचा मोठा समारंभ झाला. या समारंभाचे दुसरे दिवशींचे रात्रीं बाबानीं या बाईनां स्वप्नांत प्रत्यक्ष दर्शन देऊन त्यांचे अंतःकरण प्रेमोदित केलें होते. त्याचे दुसरे दिवशीं या बाई चांगल्या असोन सकाळीं स्नान वगैरे नित्य नैमित्तीक विधी यथासांग उरकले होते. सुमारें ११ चे सुमारास थोडे अस्वस्थ वाटूं लागोन अल्प-अवधींत कोणतेही प्रकारच्या यातनाशिवाय बाबानीं यानां सहज मरण प्राप्त करून दिलें असें दिसून येते. प्रपंचसुख व वैभवाची जोड दिलेली होतीच. S. N. K.

॥ श्री साई बाबा ॥

# जाहिर खबर.

## " क्लार्क आणि कंपनी " मुंबई यांची अत्यंत उपयुक्त औषधें.

देशी उद्योग धंद्यास उत्तेजन देणें किती जरूरीचे आहे हें कोणासही पटवून देण्याचा आतां काळ राहिलेला नाहीं. वरील कंपनीची औषधें प्रचारांत येऊन मुंबईंत व गुजराथ प्रांतांत डॉक्टर लोक त्यांचा उपयोग प्राधान्यानें करूं लागले आहेत. फक्त महाराष्ट्रांत त्यांची विशेषशी माहिती दिसत नाहीं.

हल्लींचे परिस्थितींत विदेशी औषधें दुरापास्त होऊन त्यांच्या किंमती भरमसाट वाढलेल्या आहेत. या परिस्थितीत हमेश लागणारी व उत्तम उपयुक्त ठरलेली अशी क्लार्क कंपनीची औषधें माफक किंमतीस देणेची योजना या देशी औद्योगिक कंपनीनें केलेली आहे व ती बाजारांत गिऱ्हाइकांस मिळूं शकतात.

१ **फोमेंटिंग:—** हे विलायती अँटीफ्लाजेस्टिनचे तोडीचे असून न्यूमोनियादि रोगांस फार उपयुक्त आहे.

२ **अॅक्थोडॉक्स:—** हे मलम विलायती आयोडेक्सचे तोडीचे असून वाऱ्याची सूज, जखम व त्वचेचे सर्व रोग यावर चोळल्यानें त्वरीत गुण येतो. घरांत संग्रहीं ठेवण्यासारखें आहे.

३ या शिवाय आंव, धुपणी, गरमी व परमा यांचेवरील अत्यंत गुणकारी औषधें तयार आहेत.

व्यापाऱ्यांस भरपूर कमिशननें व डॉक्टरांस माफक दरानें महाराष्ट्रांत मिळणेची योजना.

ऑर्डर्स खालील एजंट मार्फत नोंदवा :—

**मेसर्स खारकर ब्रदर्स.**

**३७, चरई रोड, ठाणें.**


---

## List of books about Shri Sai Baba.

Madras books available at Sai Samsthan, Shirdi, P. O. Rahata, Dist Ahmednagar.

For Gujrathi:—

" Guru Smriti, " ' Manache Shloka " & " Hari Path " write to Mr. Wamanrao Prangovind Patel, Head master, Society School, Umreth Dist. Kaira.

For Coloured pictures of Sai Baba:—

write to Mr. D. V. Sambare, Tejpal Road, Vile-Parle.

For Authentic Photos of Sai Baba:—

write to Mr. R. V. Ghaisas, Editor Sailila, Dadar. (sizes available card, cabinet, little bigger locket and bigger, enlargement.)

For Guide to Shirdi in English:—

As. 2

write to the clerk, Shirdi Sansthan, at Shirdi, Post Rahata, Dist. Ahmednagar

All correspondence regarding Shri Sai Leela should be addressed to-Editor Sai Lila, GokhaleRoad (North), Dadar, Bombay 14.

HEARTINA

Excellent Heart Tonic

छातीचे विकारांवर

सांडू ब्रदर्स यांचे

हार्टिना

Regd.

(HEARTINA)

छातींत कळा येणें, सुई टोंचल्या सारखं वाटणें, छातींत घबराट होणें, फुप्फुस विकार, High Blood Pressure इत्यादि विकारांवर रामबाण.

वा. किं. रु. ३ (ट. ख. नि.)

सविस्तर माहिती साठीं लिहाः—

द. कृ. सांडू ब्रदर्स, चेंबूर, लि.

आर्योषधि कारखाना.

चेंबूर—मुंबई.

सूचनाः—कोणास जाहिराती देणें असल्यास खालील पत्त्यावर पत्रव्यवहार करावा. रामचंद्र वासुदेव घैसास लो. टिळक ज्युबिली ट्रस्ट बिल्डिंग नं. २, गोखलेरोड नॉर्थ, दादर

Printed at Calendar Press, Dadar and Published by R.V. Ghaisas-Lokamanya Tilak Jubilee Trust Bldg. No.2, Gokhale Rd. North Dadar, Bombay 14